



# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे





✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष – २ रे. ✻ अंक २४६ वा. ✻ शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 246 ✻ Friday 10 April 2026 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610


## कृष्णा बँकेचे कार्यक्षेत्र आता ७ जिल्ह्यात : आ.डॉ.अतुलबाबा भोसले

### रिझर्व्ह बँकेकडून ठाणे, सोलापूर व रत्नागिरी जिल्ह्यात विस्तारास मंजुरी

कराड : ग्रामीण अर्थकारणाला चालना देत जनसामान्यांना भक्कम आर्थिक आधार देणाऱ्या कृष्णा सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र पूर्वी सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे या चार जिल्ह्यांपुरते मर्यादित होते. आता यामध्ये ठाणे, सोलापूर व रत्नागिरी जिल्ह्यांची भर पडणार असून, या नव्या तीन जिल्ह्यांमध्ये कार्यविस्तार करण्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून मंजुरी मिळाल्याची माहिती बँकेचे चेअरमन आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी दिली आहे.



याबाबत प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे, की सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पासाहेब) यांनी सन १९७१ साली सर्वसामान्य शेतकरी व कष्टकरी यांना केंद्रस्थानी ठेवून कृष्णा सहकारी बँकेची स्थापना केली. य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कृष्णा बँक गेली ५५ वर्षे सातत्याने कार्यरत असून, ग्रामीण व सर्वसामान्य घटकांचे हित जपण्याचे काम करत आहे.

बँकेच्या ३१ मार्च २०२६ अखेर एकूण ठेवी ९५१ कोटी ३५ लाख रुपये असून, ५६१ कोटी ५४ लाख रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. बँकेचा एकूण व्यवसाय १,५१२ कोटी ८९ लाख रुपयांपर्यंत पोहोचला आहे. बँकेचे भागभांडवल १२ कोटी ३० लाख रुपये असून, स्वनिधी १३० कोटी ६३ लाख रुपये इतका आहे. तसेच बँकेला २० कोटी रुपयांचा ढोबळ नफा प्राप्त झाला आहे. विशेष म्हणजे, सलग १२ व्या वर्षी निव्वळ एनपीए शून्य टक्के राखण्यात बँकेला यश आले आहे. ग्राहक सेवेसाठी बँकेने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला असून, मोबाईल बँकिंग, यूपीआयद्वारे व्यवहार (गूगल पे, फोन पे), एटीएम सुविधा, ई-कॉमर्स, आरटीजीएस/एनईएफटी, एनएसीएच यांसारख्या सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत.

सध्या सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे या चार जिल्ह्यांमध्ये २७ शाखा आणि एक विस्तारीत कक्षाद्वारे बँक सेवा देत आहे. आता रिझर्व्ह बँकेने कार्यविस्तारास मंजुरी दिल्याने लवकरच ठाणे, सोलापूर व रत्नागिरी जिल्ह्यातही बँकेच्या नव्या शाखा सुरु करुन, ग्राहकांना अधिकाधिक सुलभ सेवा देण्याचा प्रयत्न करणार असल्याची ग्वाही चेअरमन आ.डॉ. भोसले यांनी दिली आहे.

## पोलिस बंदोबस्तात पाटणमध्ये अतिक्रमणांवर जेसीबी;रस्ता रुंदीकरणाला वेग



पाटण : रस्ता रुंदीकरणाच्या कामाला अडथळा ठरत असलेल्या पाटण येथील अतिक्रमणांवर अखेर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला. नवीन एसटी स्टँडसमोरील ओढ्यालगत उभारण्यात आलेल्या टपऱ्यांवर चोख पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने कारवाई करत अतिक्रमण हटवण्यास सुरुवात करण्यात आली.

विजापूर-गुहागर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ई-१६६ अंतर्गत कराड-चिपळूण मार्गावरील पाटण शहरात सध्या रस्ता रुंदीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांवर कारवाई अपरिहार्य ठरली होती. याआधी बहुचर्चित ब्रिटिशकालीन धांडे पूल पाडण्यात आला असून आता त्यालगतच्या भागातील अडथळे दूर करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. नवीन एसटी स्टँडसमोरील ओढ्यावर मागील सुमारे ४० वर्षांपासून उभारण्यात आलेल्या सुमारे ४० ते ४५ टपऱ्यांवर ही कारवाई करण्यात येत आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या कारवाईमुळे परिसर मोकळा होत असून एसटी स्टँडचा समोरील भाग आता पूर्णपणे खुला होणार आहे.

दरम्यान, या कारवाईसाठी प्रशासनाने मोठा पोलिस बंदोबस्त ठेवला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी खबरदारी घेत टप्प्याटप्प्याने अतिक्रमण हटवण्याचे काम सुरू असून रस्ता रुंदीकरण प्रकल्पाला यामुळे गती मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## एफआरपी थकली; साखर कारखान्यांच्या मनमानीने शेतकरी दुहेरी कचाट्यात

सांगली : जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या हलगर्जी कारभाराचा फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसत असून एफआरपी (न्याय्य व लाभदायक दर) थकीत राहिल्याने शेतकरी अक्षरशः आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. जानेवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून गाळपासाठी दिलेल्या ऊसाचे पैसे दोन महिन्यांहून अधिक काळ उलटूनही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाहीत. कारखानदारांच्या या टाळाटाळीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

दरम्यान, ३१ मार्च रोजी आर्थिक वर्षाचा शेवट झाल्याने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्यायाची कुऱ्हाड कोसळली आहे. वेळेवर कर्ज फेडण्याची तयारी असूनही एफआरपी न मिळाल्याने अनेक शेतकरी बँकांच्या दृष्टीने थकीत कर्जदार ठरले आहेत. परिणामी, त्यांच्या माथी आता दंडव्याजाचा अतिरिक्त बोजा लादला जात असून प्रामाणिक शेतकरी



शिक्षा भोगत असल्याची संतापजनक स्थिती निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, हेच शेतकरी नियमित कर्जफेड करणारे असल्याने शासनाच्या कर्जमाफी योजनांपासूनही ते वंचित राहतात. एका बाजूला साखर कारखान्यांकडून हक्काचे पैसे मिळत नाहीत, तर दुसऱ्या बाजूला बँकांचे दंडव्याज, अशा दुहेरी कात्रीत शेतकरी सापडले आहेत.

या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचे सदस्य ड. सुभाष पाटील यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत साखर कारखान्यांच्या मनमानीवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना वेळेवर एफआरपी न देणाऱ्या कारखान्यांना पाठीशी घालण्याऐवजी शासनाने त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. शेतकऱ्यांवर बसणारा दंडव्याजाचा भुर्दंड संबंधित कारखान्यांकडूनच वसूल करावा. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, या गंभीर प्रश्नाकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन एफआरपीची थकबाकी तत्काळ अदा करावी व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

## हर्षवर्धन सदगीरकडून अजयला धूळ चारली; सुर्लीत रंगल्या चुरशीच्या कुस्त्या

कराड : सुर्ली (ता. कराड) येथील कुस्ती मैदानात झालेल्या अटीतटीच्या लढतींनी प्रेक्षकांची अक्षरशः मने जिंकली. महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर याने हरियाणाच्या अजयवर शानदार विजय मिळवत निकाल डावावर धूळ चारली. या प्रमुख लढतीने मैदानात उत्साहाची लाट उसळली होती.

ज्योतिर्लिंग यात्रा व पीर राजेवली उरूसानिमित्त या भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख कुस्ती माजी खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते लावण्यात आली. यावेळी माजी आमदार आनंदराव पाटील, युवा नेते विक्रमनाना घोरपडे, डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील, हिंदकेसरी संतोषआबा वेताळ, बाळासाहेब खबाले-पाटील, कामगार नेते नवनाथ पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची



उपस्थिती होती.

मैदानात लहान गटातील मल्लांनीही आपल्या दमदार कामगिरीने उपस्थितांची वाहवा मिळवली. इतर गटातील कुस्त्यांमध्ये निखिल पाटील याने मोहंमद मुजावर याला घिस्सा डावावर चितपट केले, तर अथर्व वेताळने विराजला एकलंगी डावावर नमवले. स्वप्नील मदनेसमोर सोपानची डाळ शिजली नाही. तसेच राज भोंगे, स्वप्नील पाटील, पवन डुबल, सुशांत टेंगरे, देवराज गुरव, गणेश फडतरे, विराज माने व प्रणव पाटील यांनीही प्रेक्षणीय विजय नोंदवले.

दरम्यान, सिद्धेश साळुंखे विरुद्ध विनायक दिघवड, भारत पवार विरुद्ध आण्णा पाटील, तेजस ढमाले विरुद्ध संतोष रुपनवर, तसेच स्वप्नील पाटील विरुद्ध सुयोग होनमाने यांच्यातील लढती चुरशीच्या ठरल्या. बराच वेळ रंगलेल्या या कुस्त्या अखेर पंचांनी बरोबरीत सोडवण्याचा निर्णय घेतला.कुस्ती मैदानाचे समालोचन जोतीराम वाजे यांनी प्रभावीपणे केले.

## चारचाकी वाहनासाठी एमएच-५० ए ए मालिका सुरु

### शासकीय फी भरुन आकर्षक क्रमांक आरक्षित करा

सातारा : कराड व पाटण तालुक्यातील नवीन चारचाकी वाहनासाठी डि एमएच ५०-ए ए ही ०००१ ते ९९९९ क्रमांकापर्यंतची नवीन मालिका १५ एप्रिल २०२६ रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून सुरु करण्यात येत आहे.

तरी इच्छुक वाहन धारकांकडून या मालिकेकरीता शासकीय नियमानुसार विहीत शुल्कासह अर्ज स्वीकारले जाणार असून ज्यांना आकर्षक क्रमांक घ्यावयाचे असतील त्यांनी ३ फेब्रुवारी रोजी कार्यालयाशी संपर्क साधून आकर्षक क्रमांकांची शासकीय नियमानुसार फी भरुन आरक्षित घ्यावेत, असे कराड येथील उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

१५ एप्रिल २०२६ रोजी चारचाकी वाहनांचे अर्ज क्रमांकासाठी सकाळी १० वाजलेपासून दुपारी २ वाजेपर्यंत धनाकर्षासह स्विकारले जातील. ज्या आकर्षक कमांकासाठी एकच अर्ज प्राप्त झाला असेल त्या अर्जदारास त्याच दिवशी आकर्षक नोंदणी क्रमांक देण्यात येईल. एकापेक्षा अधिक अर्जदारांनी पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी अर्ज केल्यास अशा प्रकरणात अर्जदारास कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी २ वाजेपर्यंत निर्धारित फी पेक्षा जादा रकमेचे धनाकर्ष बंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक आहे.

जो अर्जदार सर्वात जास्त रकमेचा धनाकर्ष सादर करेल त्यास पसंतीचा क्रमांक देण्यात येईल. उर्वरीत अर्जदारांना धनाकर्ष त्वरीत परत देण्यात येतील. आकर्षक नंबर आरक्षित केल्यानंतर १८० दिवसांच्या आत वाहन धारकांनी वाहनाची नोंदणी करणे बंधनकारक आहे.

## उरमोडी धरणाला 'छत्रपती अभयसिंहराजे भोसले जलाशय' नाव

### राज्य शासनाचा निर्णय : इतिहास, परंपरा आणि लोकभावनेचा सन्मान

सातारा : जिल्ह्यातील सातारा, खटाव व माण तालुक्यातील सिंचन व्यवस्थेला उरमोडी धरणाने भक्कम आधार दिला आहे. जिल्ह्यातील मोठा प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणार्या उरमोडी धरण जलाशयाचे 'छत्रपती अभयसिंहराजे भोसले जलाशय' असे नामकरण करण्याचा निर्णय राज्य शासनाने बुधवारी घेतला. विशेष बाब म्हणून जलसंपदा विभागाचा हा शासन निर्णय इतिहास, परंपरा आणि लोकभावनेचा सन्मान करणारा ठरला आहे.



उरमोडी धरणामुळे जिल्ह्याच्या कृषी क्षेत्राला मोठा फायदा झाला आहे. विशेषत: पावसावर अवलंबून असलेल्या माण, खटाव तालुक्यातील शेतकर्यांना या धरणामुळे दिलासा मिळाला आहे. या धरणाच्या जलाशयाला ऐतिहासिक व स्थानिक महत्त्व असलेल्या व्यक्तिमत्त्वाचे नावे देण्याची मागणी बर्याच वर्षांपासून शासनाकडे होत होती. उरमोडी धरण जलाशयाला 'छत्रपती अभयसिंहराजे भोसले जलाशय' असे नाव दिल्याने स्थानिक पातळीवर ऐतिहासिक परंपरेचा गौरव होणार असल्याची भावना जनतेतून व्यक्त होत आहे. शिवाय, सातारा जिल्ह्याच्या सामाजिक व सांस्कृतिक ओळखीला नवे कोंदण मिळाल्याची भावना जनमाणसात निर्माण झाली आहे.

उरमोडी धरणाच्या उभारणीत स्व. अभयसिंहराजे भोसले यांचा मोलाचा वाटा आहे. सातारा, खटाव व माण तालुक्यातील कोरडवाहू शेतीला भक्कम आधार मिळाला आहे. या धरणामुळे वर्षभर पाणी उपलब्ध झाल्याने पिकांची उत्पादकता आणि पीकपद्धतीत मोठे बदल झाले आहेत. दुष्काळी परिस्थितीतही शेतकर्यांना स्थैर्य देणारा जलस्रोत म्हणून उरमोडी धरण महत्त्वाचे ठरले आहे. सिंचनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळून रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. स्व. छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांनी सातारा जिलह्याच्या राजकारणात प्रभावी नेतृत्व निर्माण केले. सहकार क्षेत्रात त्यांनी विविध संस्थांच्या माध्यमातून शेतकरी व सामान्यांच्या विकासाला गती दिली. सामाजिक कार्यातून त्यांनी शिक्षण, आरोग्य व ग्रामीण विकासात भरीव योगदान दिले. स्थानिक पातळीवर लोकसंपर्क व विकासकामांमुळे त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली. त्यामुळे उरमोडी जलाशयाला त्यांचे नाव देणे हा स्थानिक लोकभावनेचा सन्मान मानला जात आहे. स्व. छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांचाच वारसा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले हे चालवताना दिसत आहेत. त्यांच्या माध्यमातून उरमोडी धरण प्रकल्पच्या दोन्ही कालव्यांचे काम मार्गी लागले आहे. यां जलाशयाला स्व. अभयसिंहराजे भोसले यांचे नाव दिल्याने जनतेतून समाधान व्यक्त होत आहे

## चिंतामणी हॉस्पिटलमधील महिला कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा, दोन तोळ्यांची सोन्याची चैन केली परत

जेजुरी(प्रतिनिधी): दिनांक ७ चिंतामणी हॉस्पिटल सासवड येथे काम करणाऱ्या मावशी नंदा घाडगे यांना हॉस्पिटल मध्ये एका रुणाच्या नातेवाईकांची सोन्याची दोन तोळ्यांची चैन सापडली.त्यांनी प्रामाणिक पने ही सोन्याची चेन परत केली.त्यांच्या प्रामाणिक पणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



चिंतामणी हॉस्पिटल मधील बालरोग तज्ञ डॉ विनायक बांदेकर यांचे पेशंट कु. ओजस्वी गणेश गायकवाड यांचे वडील गणेश गायकवाड यांची दोन तोळ्यांची सोन्याची चेन चिंतामणी हॉस्पिटल पार्किंग विभागात हरवली होती. ही चेन हॉस्पिटल मध्ये काम करणाऱ्या नंदा घाडगे मावशी यांना सापडली. नंदा घाडगे यांनी प्रामाणिकपणे ती चेन संबंधित कुटुंबाला परत केली. त्यांच्या या प्रामाणिकपणा व कर्तव्यनिष्ठेचे हॉस्पिटल मधील संचालक यांच्याकडून कौतुक करण्यात आले.

संबंधित गणेश गायकवाड , रामचंद्र पवार यांनी नंदा घाडगे मावशी यांचा साडी चोळी तसेच काही रोख स्वरुपाची रक्कम देऊन सत्कार केला. त्यांच्या या प्रामाणिक कृतीमुळे हॉस्पिटल मध्ये चांगला संदेश गेला असून सर्वत्र त्यांचे अभिनंदन व कोतुक केले जात आहे. असे डॉ संजय रावळ यांनी सांगितले.

## संपादकीय....

# एका युगाचा अस्त

गावकुसापासून ते जिल्ह्याच्या सीमारेषेपर्यंत, आणि सहकाराच्या पायवाटेपासून ते विकासाच्या महामार्गापर्यंत ज्यांनी आपल्या कर्तृत्वाची ठळक छाप उमटवली, असे बिऊरचे भूषण कै. दिनकरराव दौलू पाटील (भाऊ) आज आपल्यात नाहीत. त्यांच्या जाण्याने केवळ एक व्यक्ती हरपलेली नाही, तर कष्ट, प्रामाणिकपणा आणि समाजनिष्ठेच्या पायावर उभा असलेला एक संपूर्ण कालखंडच काळाच्या पडद्याआड गेला आहे.भाऊ म्हणजे एका जिद्दीचा प्रवास होता. 'गुरुजी' म्हणून ओळख निर्माण करत त्यांनी शिक्षण क्षेत्रात पाऊल टाकले, पण त्यांच्या ध्येयाला मर्यादांची चौकट मान्य नव्हती. शिक्षकाच्या सुरक्षित वाटेवरून ते विकासाच्या खडतर रस्त्यावर उतरले आणि कंत्राटदारीच्या माध्यमातून त्यांनी अक्षरशः रस्तेच नव्हे, तर विश्वासाचे पूल उभारले. सांगली, कोल्हापूर, रत्नागिरीच्या भूमीत त्यांच्या कामाची साक्ष देणारे अनेक मार्ग आजही ठामपणे उभे आहेत.सहकार हा त्यांच्या विचारांचा गाभा होता. सत्तेची शिडी नव्हे, तर समाजउभारणीचे साधन म्हणून त्यांनी सहकाराकडे पाहिले. विश्वास सहकारी साखर कारखान्यापासून ते गावातील दत्तसेवा सोसायटी, दूध संस्था, मजूर संघटना आणि पाणीपुरवठा संस्था-या सर्वांमधून त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. भाऊंच्या कार्यपद्धतीत एक वैशिष्ट्य होते-ते बोलण्यापेक्षा करण्यावर विश्वास ठेवत.मातीशी नाळ जोडलेला हा माणूस शेतीतही तितकाच प्रयोगशील होता. 'शेतीनिष्ठ' हा सन्मान त्यांच्या कार्याचा केवळ एक टप्पा होता; पण त्यांनी उभारलेला 'आदर्श गोठा' हा त्यांच्या दूरदृष्टीचा जिवंत नमुना ठरला. आज आधुनिक शेतीचे जे तत्त्वज्ञान मांडले जाते, त्याचे बीज त्यांनी खूप आधी पेरले होते.भाऊंच्या व्यक्तिमत्त्वात शिस्त आणि माणुसकी यांचा अद्भुत संगम होता. बाहेरून कठोर भासणारा हा स्वभाव आतून मात्र प्रेमळ आणि जिव्हाळ्याचा होता. आयुष्यातील अनेक आघात त्यांनी निःशब्दपणे पचवले, पण कधीही आपल्या कर्तव्याच्या मार्गावरून ढळले नाहीत. देश-विदेश फिरूनही त्यांचे मन शेवटी आपल्या मातीतच रमत राहिले-हेच त्यांच्या भूमीशी असलेल्या नात्याचे द्योतक आहे.आजच्या दिखाऊपणाच्या आणि स्वार्थाच्या काळात भाऊंसारखी व्यक्तिमत्त्वे विरळ होत चालली आहेत. त्यांनी कधीच प्रकाशझोतात राहण्याचा प्रयत्न केला नाही, पण त्यांच्या कार्यानेच त्यांना अढळ स्थान मिळवून दिले. त्यांची ओळख पदांमध्ये नव्हे, तर त्यांनी घडवलेल्या माणसांमध्ये आणि उभ्या केलेल्या संस्थांमध्ये आहे.भाऊंच्या जाण्याने एक विशाल वटवृक्ष कोसळला आहे. पण त्या वटवृक्षाच्या सावलीत वाढलेली माणसे, त्यातून रुजलेली मूल्ये आणि समाजकारणाची शिकवण हीच त्यांची खरी स्मृती ठरणार आहे. आज, या 'आधारवडा'ला निरोप देताना एकच प्रश्न मनात उभा राहतो-अशा माणसांची उणीव भरून काढण्याची ताकद आजच्या समाजात आहे का? कै. दिनकरराव पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली! त्यांच्या कार्याचा वारसा जपणे, हाच त्यांना खरा मानाचा मुजरा ठरेल.

# हर.. हर.. महादेव, भक्तांना दर्शन देऊन श्री जोगेश्वरीमाता पालखी ८३ तासानंतर मंदिरात





नागोठणे : नागोठणे शहाराची ग्रामदैवता श्री. जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराज यांची पालखी उत्सव जोगेश्वरी मंदिरातून निघून संपूर्ण शहरात चार दिवस तीन रात्र असे साधारण ८३ तास अहोरात्र फिरून पालखीचे सोमवार ०६ एप्रिल रोजी रात्री ९.३० वा.च्या दरम्यान भक्तांना दर्शन देऊन मंदिरात आगमन झाले.यावेळी खा. सुनील तटकरे, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर,जि.प. आरोग्य व शिक्षण सभापती वैकुंठ पाटील,जि.प.सदस्य सुमित काते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पालखीचे दर्शन घेतले.

नागोठणे शहराची ग्रामदैवता श्री. जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराजांची चैत्र पौर्णिमेच्या दुसर्या दिवशी साजरा होणारा पालखी सोहळा साजरा करण्यात येतो. ठरल्यानुसार पालखी सकाळी १०.०० वा. जोगेश्वरी ट्रस्टचे अध्यक्ष नरेंद्र जैन,विश्वस्त दिलीप टके, देवीचे वतनदार व मानकरी मधुकर पोवळे,राजेश पोवळे, उत्सव कमिटीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर यांच्यासह ट्रस्ट व उत्सव कमिटीचे सर्व पदाधिकारी-सदस्य,ग्रामस्थ व भक्तगणांच्या उपस्थितीत देवीचे भक्त मधुकर पोवळे यांच्या हस्ते विधिवत पुजा करून देवीचे मुखवटे सजवलेल्या पालखीत विराजमान करण्यात आले. त्यानंतर फटाक्यांच्या आताषबाजी, ढोल ताशांच्या गजरात,'श्री. जोगेश्वरी माते की जय,भैरवनाथ महाराज की जय'',हर हर महादेवच्या जयघोषात, गोंधळी, वारकरी भजन मंडळ तसेच हजारो भक्तगणांच्या साथीने पालखी शहरामध्ये भक्तांना दर्शन देण्यासाठी मार्गस्थ झाली. रात्रभर फिरणार्या पालखीसाठी उत्तम प्रकारे जनरेटर व लाईटची तसेच बाहेर गावावरून आलेल्या भाविकांसाठी भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली होती. शहरातील विविध भागातील भक्तांना दर्शन देऊन चार दिवस तीन रात्र असे जवळ जवळ ८३ तासांनी भक्तिभावाने मंदिरात आगमन झाले. पालखीच्या आगमनानंतर मंदिरात उत्सव कमिटीतर्फे पालखी सोहळ्यास सहभागी झालेले सर्व ढोल-ताशा पथक, गोंधळी,वारकरी संप्रदाय तसेच सहकार्य करणारे पोलिस स्टेशन, ग्रामपंचायत,पत्रकार,देणगीदार तसेच इतर सहकार्य लाभलेल्याचे ट्रस्ट सचिव भाई टके,उत्सव कमिटी अध्यक्ष चंद्रकांत ताडकर तसेच इतर मान्यवर व कमिटी सदस्यांनी श्रीफळ व प्रसाद देऊन आभार मानले. सदरील पालखी उत्सव सोहळ्यात कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी सहा. पो.नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पालखी निमित्त महापूजा व विद्युत रोषणाई - पालखी सोहळा निमित्त मंदिरात सत्यनारायणाची महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. या पालखी सोहळ्यानिमित्त दर वर्षी प्रमाणे या वर्षीही ग्रामस्थ मंडळ, खडकआळी यांनी देवीची काठी सजवून मंदिरासमोर उभी केली. पालखी निमित्ताने जोगेश्वरी मंदिर,मरीआई मंदिर, गणपति मंदिर तसेच मंदिराच्या परिसरातील तीन तळी व सभोवताली असलेल्या झाडांवर आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

उद्योगधंद्यासाठी बाहेरगावी गेलेले नागोठणेकर व माहेर वाशिण यांची उपस्थितीत - शहरातील ग्रामपंचायत,बंगलेआळी, पोलिस ठाणे, खालची आळी, छत्रपती शिवाजी महाराज चौ, दोन्ही कोळीवाडे, छत्रपती शिवाजी पेठ, गांधी चौक, के.एम.जी.विभाग, प्रभूआळी, आंगर आळी, जोगेश्वरी नगर, रामनगर, बाळासाहेब ठाकरे नगर तसेच खडकआळी परिसरातील आपल्या भक्तांनी पालखीचे स्वागत घरासमोर मंडप, पताका, विद्युत रोषणाई,रांगोळी काढून, वाजत-गाजत, भक्तिभावाने पुजा-अर्चा करून तसेच आलेल्या भाविकांना चहा-नाश्ता व थंड पेय देवून केले.यावेळी उद्योगधंद्यासाठी बाहेरगावी गेलेले नागोठणेकर व माहेरवाशींनी तसेच परिसरातील भक्तगण मोठ्या संख्येने पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते.

# प्रभावी जनसंपर्कासाठी तंत्रज्ञान आणि मानवी संवेदनांचा समन्वय आवश्यक-आर.विमला




दिल्ली : समाजात माहितीचा प्रसार वेगाने होत असतांना समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्यासाठी जनसंपर्क प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने जनसंपर्क क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रत्येकाने तंत्रज्ञान आणि मानवी संवेदनांचा समन्वय साधून काम करावे, असे आवाहन महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आर. विमला यांनी आज येथे केले. माहिती युगातील जनसंपर्काची दिशा निश्चित करण्यासाठी माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयातर्फे आयोजित राष्ट्रीय जनसंपर्क परिषद उपयुक्त ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रातर्फे आयोजित ' जनसंपर्क परिषद-२०२६' च्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास महाराष्ट्र सदनाच्या विशेष निवासी आयुक्त श्वेता सिंघल, कर्नाटकच्या माहिती व जनसंपर्क विभागाचे आयुक्त हेमंत निंबाळकर, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल आदी यावेळी उपस्थित होते.

माहिती प्रसार क्षेत्रातील अधिकाऱ्यांना एका व्यासपीठावर आणण्याचा महाराष्ट्र परिचय केंद्राचा हा प्रयत्न स्तुत्य असून माणसाला माणसाशी जोडण्याचा हा प्रयत्न असल्याचे नमूद करून श्रीमती आर. विमला म्हणाल्या, केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिक प्रभावी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. माहिती क्षेत्रातील एक अधिकारी प्रशासनाचा महत्वाचा कणा असतो, तो समाजातील बदलाचा अग्रदूत आहे. यादृष्टीने आपली तंत्रज्ञान युगातील भूमिका निश्चित करण्यासाठी या परिषदेत साधक बाधक चर्चा व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

श्रीमती सिंघल म्हणाल्या, गेल्या काही वर्षात माध्यम व्यवस्थापन वेगाने बदलले आहे. तंत्रज्ञानाच्या उपयोगमुळे माहितीचा प्रसार वेगाने होत असतांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग प्रभावी ठरू शकेल. तसेच समाज माध्यमाद्वारे माहिती प्रसार वेगाने करता येईल. भविष्यातील नव्या तंत्रज्ञानाला सामोरे जातांना या ज्ञानाचा प्रसार आणि उपयोग महत्वाचा आहे. त्यादृष्टीने एक संवाद शृंखला तयार करण्यासाठी दोन दिवसाची ही कार्यशाळा उपयुक्त ठरेल आणि एकमेकांशी संवाद साधून माहितीच्या देवाणघेवाणीची मोठी शृंखाला यातून निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात वेगाने बदल होत असतांना वस्तुनिष्ठ माहितीचे व्यवस्थापन ही आजची महत्वाची गरज आहे. फेक न्यूज वेळेवर ट्रॅक करून जनतेला त्यातील खोटेपणा त्याचवेळी सांगणे हे आजचे आवाहन आहे, असे श्री.निंबाळकर म्हणाले. जाणीवपूर्वक पसरविण्यात येणाऱ्या खोट्या बातम्या राज्यासाठी हानिकारक ठरू शकतात. अशा बातम्यांना वेळीच रोखणे गरजेचे आहे. त्यासाठी नवे तंत्रज्ञान आत्मसात करून माहिती व जनसंपर्क क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी जनतेतही या संदर्भातील जागरूकता निर्माण करावी. प्रभावी संवादद्वारे हे शक्य असून अशा संवादाच्या विविध पैलूंवर परिषदेत विचार व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रास्ताविकात संचालक श्री. बागुल म्हणाले, जनसंपर्काच्या क्षेत्रात वेगाने होणारे बदल आत्मसात करणे आणि त्यासोबत संवाद प्रक्रिया गतिमान करणे गरजेचे आहे. त्यासाठी नव्या युगातील तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातील नवे बदल जाणून घेणेही महत्वाचे आहे. त्यादृष्टीने या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या परस्पर संवादातून या क्षेत्रातील चांगल्या प्रयोगाची माहिती परस्परांना होण्यासोबत भविष्यातील वाटचालीसाठी नवा दृष्टीकोन मिळू शकेल, असे त्यांनी सांगितले. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत देशातील २५ राज्याच्या माहिती व जनसंपर्क विभागातील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले आहेत.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचा शुभारंभ

## पुणे विभागात विविध कार्यक्रमाचे आयोजन; अधिकाधिक नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा-प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे



पुणे : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त पुणे विभागातील पुणे, सातारा,सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, या कार्यक्रमाचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांनी केले आहे.

प्रादेशिक कार्यालयात प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सप्ताहाचा शुभारंभ झाला. यावेळी सहायक संचालक (वित्त व लेखा) अनिल गिते , सहायक आयुक्त विशाल लोंढे, माधुरी वाघमोडे, ज्ञानेश्वर जावळे, समाज कल्याण अधिकारी उपस्थित होते. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत सप्ताहाची माहिती देण्यासोबतच भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करण्यात आले.

या सप्ताहाच्या माध्यमातून सामाजिक समता, महापुरुषांचे विचार आणि शासकीय योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत. या सप्ताहाच्या नियोजनाबाबत पुणे विभागातील जिल्हा स्तरावर शहरी व ग्रामिण भागात सहाय्यक आयुक्त समाज कल्याण पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, व कोल्हापूर या कार्यालयाने आपापल्या कार्यक्षेत्रात जय्यत तयारी केली असून, या सात दिवसांत खालीलप्रमाणे विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

दिनांक ९ एप्रिल रोजी युवा संवाद कार्यक्रमाअंतर्गत महाविद्यालये व शासकीय वसतिगृहांमध्ये महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष, संत गाडगे महाराज यांची १५० वी जयंती आणि आंबेडकरी विचार या विषयांवर व्याख्याने व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.दिनांक १० एप्रिल रोजी योजना प्रबोधन कार्यक्रमाअंतर्गत समता दूतांमार्फत पथनाट्ये व लघुनाटिका सादर करून शासकीय योजनांचे प्रबोधन करण्यात येणार आहे. तसेच 'मार्जिन मनी' योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे.

दिनांक ११ एप्रिल रोजी महात्मा फुले जयंतीनिमित्त महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विविध गौरवपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. दिनांक १२ एप्रिल रोजी संविधान जागर व महिला मेळाव्याअंतर्गत संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्यांवर व्याख्याने आयोजित केली असून, महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष महिला मेळावा घेण्यात येणार आहे. दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सामाजिक बांधिलकी उपक्रमाअंतर्गत ज्येष्ठ नागरिक मेळावा, रक्तदान शिबीर आणि स्वच्छता अभियानाद्वारे सामाजिक सेवेचे व्रत जोपासले जाईल. तसेच कोल्हापूर औद्योगिक संस्था मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित केली जाईल

दिनांक १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून जयंती साजरी केली जाणार असून व्याख्याने आणि चर्चासत्रांनंतर या सामाजिक समता सप्ताहाचा समारोप होणार आहे.

# साताऱ्यात हिंदु जनजागृती समितीचे जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन; मदरसा अनुदान रद्द करण्याची मागणी




सातारा : डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेअंतर्गत राज्यातील २१ जिल्ह्यांमधील ३०८ मदरशांना प्रत्येकी ५० लाख रुपये अनुदान देण्याच्या शासननिर्णयाला विरोध करत हिंदु जनजागृती समिती आणि विविध हिंदू कार्यकर्त्यांनी आज सातारा येथील जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन दिले. हे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांच्या नावे सादर करण्यात आले.

या वेळी आरएसएस धर्मजागरण प्रमुख श्री सचिन वालकर, हिंदु जनजागृती समितीच्या सौ. भक्ती डाफळे, मंदिर महासंघाचे अमोल गोसावी, हिंदू महासभेचे श्री. उमेश गांधी, हिंदु जनजागृती समितीचे श्री. हेमंत सोनावणे, श्री पंचपाळी हौद दुर्गा माता मंदिर ट्रस्टचे विश्वस्त तथा महाराष्ट्र मंदिर महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजीराव तुपे, श्री. योगेश्वर महादेव मंदिरचे श्री. अजित सुपेकर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री. हेमंत सदावर्ते उपस्थित होते.

या निवेदनात, राज्य शासनाने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचा आदर ठेवून सर्व समाजघटकांमध्ये समानतेने वागावे, अशी मागणी करण्यात आली. एका विशिष्ट धार्मिक संस्थांसाठी मोठ्या प्रमाणावर शासकीय निधी दिला जात असल्यास, त्याच न्यायाने वेदपाठशाळा, वारकरी शिक्षण संस्था तसेच इतर हिंदू धार्मिक शिक्षण संस्थांनाही समान आर्थिक सहाय्य मिळाले पाहिजे, असेही नमूद करण्यात आले. निवेदनकर्त्यांनी राज्यातील मदरशांचा आर्थिक व्यवहार, विद्यार्थी संख्या आणि अनुदानाच्या वापराची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. तसेच धार्मिक शिक्षण देणाऱ्या सर्व संस्थांसाठी शासनाने समान निकष लागू करावेत, अशी भूमिका मांडण्यात आली.

हिंदु जनजागृती समितीच्या कार्यकर्त्यांनी सांगितले की, सार्वजनिक निधीचा वापर सर्व नागरिकांच्या हितासाठी व्हायला हवा; एका विशिष्ट धार्मिक वर्गासाठीच तो वापरला जाणे अन्यायकारक आहे. शासनाने हा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा राज्यभर लोकशाही मार्गाने आंदोलन उभे केले जाईल, असा इशाराही देण्यात आला.

**प्रमुख मागण्या - ✻ मदरशांना मंजूर ५० लाखांचे अनुदान तात्काळ रद्द करावे.✻ राज्यातील मदरशांचे तातडीने सर्वेक्षण करून चौकशी करावी. ✻ वेदपाठशाळा, वारकरी शिक्षण संस्था आणि इतर हिंदू धार्मिक शिक्षण संस्थांनाही समान निधी द्यावा. ✻ मदरशांमध्ये काय शिकवले जाते, याची नियमित तपासणी करावी. ✻ हिंदु जनजागृती समितीने शासनाने निर्णय मागे न घेतल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन उभे केले जाईल, असा इशारा दिला. याच विषयावर येत्या काही दिवसात फलटण, वाई, कराड, वडूज यांसह विविध तालुक्यांमध्येही निवेदन देण्यात येणार आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.**



# मांगलेत जोतिबा सासन काठीचे विराज नाईक यांच्या हस्ते पूजन

**शिराळा :मांगले (ता. शिराळा) येथील कुंभार समाजाच्या मानाच्या जोतिबा सासण काठीच्या आरती जिल्हा परिषद सदस्य श्री. विराज नाईक यांनी केली व दर्शन घेतले. यावेळी पंचायत समिती सदस्य मोहन पाटील, उपसरपंच पांडुरंग कुंभार, प्रशांत पाटील, सुशांत शिराळकर यांच्यासह समाजातील नागरिक, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ✻ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# किल्ले रायगड येथे एनडीआरएफकडून रोप-वे रेस्क्यू मॉक ड्रिल संपन्न

**(याकूब सय्यद)**

रायगड : किल्ले रायगड येथे आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने यांच्या मार्फत रायगड रोप-वे रेस्क्यू ऑपरेशनची मॉक एक्सरसाइज यशस्वीरित्या पार पडली. या सरावाचा उद्देश आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ आणि समन्वयित प्रतिसाद देण्याची क्षमता वाढविणे हा होता.या मॉक ड्रिलमध्ये रोप-वेवरील संभाव्य अपघात गृहित धरून बचावकार्याची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करण्यात आली. प्रशिक्षित जवानांनी अत्याधुनिक उपकरणांच्या सहाय्याने अडकलेल्या प्रवाशांची सुरक्षित सुटका करण्याची प्रक्रिया



दाखवून दिली.

या उपक्रमात भारतीय सेना, (धुळे व नागपूर), जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, उपविभागीय अधिकारी महाड, तहसीलदार महाड, आपदा मित्र, रायगड रोप-वे प्रशासन, आरोग्य विभाग तसेच महाड अग्निशमन दल यांचा सहभाग होता. सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधत अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रभावीरीत्या ही मॉक एक्सरसाइज पूर्ण केली. अशा प्रकारच्या सरावांमुळे प्रत्यक्ष आपत्तीच्या वेळी होणारी हानी कमी करण्यास मदत होणार असून प्रशासनाची तयारी अधिक भक्कम होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी प्रत्येक घटकाला योगदान द्यावे लागेल: राज्यपाल जिष्णु देव वर्मा

मुंबई : देशात दरवर्षी ३४ लाख टन प्लास्टिक कचरा तयार होत आहे. यापैकी ४० टक्के प्लास्टिक अंतिमतः नदी, नाले व भूगर्भात जात आहे. नद्या व समुद्रात प्लास्टिक गेल्यामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. प्लास्टिक प्रदूषणामुळे मत्यव्यवसाय, पर्यटन व आरोग्याला धोका निर्माण होत आहे.

त्यामुळे प्लास्टिकला योग्य पर्याय शोधावा लागेल आणि प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाला योगदान द्यावे लागेल, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज येथे केले. संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण विभागातर्फे 'प्लास्टिक उत्पादने व प्लास्टिक पॅकेजिंग आवरणांचा पर्यावरणावरील दुष्परिणाम' या विषयावर आयोजित तज्ज्ञांच्या मुंबई येथे झालेल्या चर्चासत्राला राज्यपाल संबोधित करीत होते.




स्वच्छ पाणी व स्वच्छ पर्यावरणाशिवाय विकसित भारताचे लक्ष्य गाठता येणार नाही असे सांगून प्लास्टिक पासून पर्यावरणाला होणारा धोका लक्षात घेऊन कॉर्पोरेट, उद्योग, नीती निर्माते या सर्वांना या कार्यात पुढाकार घ्यावा लागेल व त्यासाठी विद्यार्थी, युवक व समाजाच्या इतर सर्व घटकांमध्ये जागरुकता निर्माण करावी लागेल, असे राज्यपालांनी सांगितले.

शाश्वततेशिवाय झालेल्या विकासाला 'विकास' म्हणता येणार नाही असे सांगून राज्यपालांनी प्लास्टिक प्रदूषणाच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी शासन, उद्योग जगत आणि नागरिकांना एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

# समतावादी विचारांचा प्रसार करत अंधश्रद्धा, कर्मकांड, व अनाठायी खर्चाला विरोध करून समाजप्रबोधनात्मक सत्यशोधक विवाह घडावेत-मंत्री छगन भुजबळ

नागपूर : फुले शाहू आंबेडकर एज्युकेशनल अँड सोशल फाऊंडेशन पुणे चे बहुउद्देशीय सत्यशोधक केंद्रातर्फे थोर समाज सुधारक महात्मा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त सोमवार दि.६ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री सिद्धेश्वर सभागृह , नागपूर येथे सत्यशोधक विकास दत्तात्रय बोराटे ,फलटण आणि सत्याशोधिका प्रतिक्षा सुरेश पोहनकर यांचा महात्मा फुले यांना अभिप्रेत असलेल्या पद्धतीने मोफत ५५ वा. सत्यशोधक विवाह सोहळा शानदार पणे पार पडला.याप्रसंगी मी सावित्रीमाई फुले बोलतेय हे नाटक चंद्रपूर च्या आयु.गायत्री अनिलकुमार रामटेके यांनी प्रबोधनात्मक सादर केल्याने सोहळ्यास मोठी रंगत आली.



या सोहळ्याचे विधिकर्ते म्हणून संस्थेचे अध्यक्ष व महात्मा फुले चरित्र साधने साहित्य व प्रकाशन समितीचे निमंत्रित सदस्य सत्यशोधक रघुनाथ ढोक ह्यांनी नेहमी प्रमाणे महात्मा फुले यांच्या वेशभूषेत विधी कार्य पार पाडले. यावेळी वधू वर याना सत्यशोधक विवाह प्रमाणपत्र आणि थोर समाज सुधारक महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांची फोटो फ्रेम भेट नागपूरचे नामवंत वकील केशव काकपुरे व रघुनाथ ढोक यांचे शुभहस्ते देण्यात आले. तसेच यावेळी वधू वर यांचे आई वडील तसेच मामा मामी यांना व एकपात्री कलाकार गायत्री रामटेके यांना देखील राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे वतीने फलटण साखर कारखान्याचे संचालक मा.पोपट जाधव व नागपूरचे एकाग्रता प्रशिक्षण व शोध संस्थेचे सचिव मा.विलास येसकर यांचे शुभहस्ते सन्मान पत्र ,शाल, श्रीफळ आणि १९९ मान्यवरांना महात्मा फुले गीत चरित्र व ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले ग्रंथ भेट देण्यात आले.

या सत्यशोधक विवाह सोहळ्यासाठी राज्याचे अन्न पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी वधूवर यांना शुभेच्छा संदेश देताना म्हंटले की हा सोहळा सामाजिक परिवर्तनाचा आदर्श नमुना असून अशा उपक्रमामुळे समाजात, समता, बंधुता, व मानवतावादी मुल्ये अधिक दृढ होत आहे. समतावादी विचारांचा प्रसार केल्याने अंधश्रद्धा, कर्मकांड, व अनाठायी खर्चाला विरोध करून साध्या सुसुस्कृत आणि समाजप्रबोधनात्मक पद्धतीने सत्यशोधक विवाह संस्थेने घडवून आणला आणि ही चळवळ महाराष्ट्रासह राज्याबाहेरही पोहोचवली ही अभिमानाची बाब आहे असे आयोजक रघुनाथ ढोक यांचे देखील कौतुक करीत हे कार्य व्यापक होवो आणि समाजाला सतत योग्य दिशा देत राहो, ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# पंतप्रधान इंटर्नशिप योजनेसाठी नोंदणी करण्याचे आवाहन

सातारा : पंतप्रधान इंटर्नशिप योजनेच्या तिसऱ्या फेरीसाठी अर्ज प्रक्रिया सुरु झाली आहे. या योजनेअंतर्गत देशातील १८ ते २५ वर्षे वयोगटातील एक लाखाहून अधिक तरुणांन मोठ्या कंपन्यांमध्ये इंटर्नशिप दिली जाणार आहे. कोणत्याही ठिकाणी नोकरी करत नसलेल्या युवकांसाठी ही योजना असून या योजनेचा युवकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुनिल पवार यांनी केले आहे.

ही योजना सुरु करण्यामागचा उद्देश बेरोजगार तरुणांना रोजगाराची योग्य संधी उपलब्ध करून देणे हा आहे. या योजनेअंतर्गत तरुणांना रोजगारक्षम करण्यासाठी टॉप कंपन्यांमध्ये इंटर्नशिपचीसंधी मिळेल. या अंतर्गत युवकांना ६ ते ९ महिन्यांसाठी इंटर्नशिप मिळेल. या सोबतच त्यांना दरमहा ९००० रुपये विद्यावेतन मिळेल. दहावी, बारावी, आयटीआय, पदविका किंवा पदवीधर अशा उमेदवारांनी इंटर्नशिप संधीसाठीनोंदणी योजनेच्या तिसऱ्या फेरीसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी करावी. या http://pminternship.mca.gov.in पोर्टलवर प्रोफाईल तयार करून विविध क्षेत्रातील इंटर्नशिपसाठी अर्ज करावा. उमेदवार अर्ज करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत जास्तीत जास्त तीन इंटर्नशिपसाठी अर्ज करू शकतात. या योजनेअंतर्गत भारत सरकारकडून प्रत्येक प्रशिक्षणार्थीला प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेंतर्गत विमा संरक्षण प्रदान केले जाते. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सातारा येथे संपर्क करावा.

# खाजगी आस्थापना, उद्योगांनी प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

सातारा : कौशल विकास व उद्यमशिलता मंत्रालय, भारत सरकार विभागामार्फत प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (झचघतध) ४.० या एका महात्त्वाकांक्षी योजना सुरु आहे. देशातील १५ ते ४५ वयोगटातील युवक युवतींना कुशल करुन त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासह उपजिविकेसाठी आत्मनिर्भर बनविणे या योजनेचा उद्देश आहे.

विविध क्षेत्रांतील गुणवत्ता पूर्ण कौशल्य प्रशिक्षण घेतल्याने राज्यातील कार्यकारी शक्तीच्या उत्पादकतेला चालना मिळणार आहे. तरी सदरील योजनेच्या माध्यमातून ज्या खाजगी आस्थापना अथवा उद्योग क्षेत्र प्रशिक्षण देण्यास इच्छुक असतील, त्यांनी या कार्यालयाचा ई-मेल satararojgargmail.com अथवा ८३०८३८३६३७ या दूरध्वनीवर १० एप्रिल २०२६ पर्यंत संपर्क करावा, असे अवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुनिल पवार यांनी केले आहे.

जिल्हयातील खाजगी आस्थापना, उद्योग क्षेत्र यांना विविध क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणात कमतरता भासत आहे. तीच कमतरता भरुन काढण्यासाठी सदर योजनेतून शासकीय अनुदानामधून आपल्या आस्थापनांच्या ठिकाणी आपणास आवश्यक असणा-या क्षेत्रामध्ये उमेदवारांना प्रशिक्षण देवून त्यांना आपल्याच आस्थापनेमध्ये रोजगार देण्याची संधी या योजनेच्या माध्यमातून प्राप्त होणार आहे.

# पुरस्कारासाठी २८ एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

सातारा : सातारा जिल्हा परिषदेमार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सातारा जिल्हयातील दलित, मागास स्त्रिया, उपेक्षित कष्टकरी वर्गाचे सामाजिक शैक्षणिक प्रबोधन करुन या क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या जिल्हयातील एका संस्थेस १० हजार व एका व्यक्तीस ७ हजार प्रोत्साहनात्मक पुरस्कार देण्यात येणार आहे. इच्छुक संस्था व व्यक्ती यांनी प्रस्ताव २८ एप्रिल पर्यंत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सातारा यांच्या कार्यालयात सादर करावीत.

संस्था व व्यक्ती यानी सादर करावयाच्या नमुन्याच्या प्रती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. संस्था व व्यक्ती यांना पोलिस अधिक्षक यांचा चारित्र्य दाखला (पोलिस व्हेरिफिकेशन) असणे गरजेचे आहे. संस्था व व्यक्तीची निवड जिल्हा निवड समिती मार्फत छाननी नंतर करण्यात येईल, असेही शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अनिस नायकवडी यांनी कळविले आहे.

# मार्च अखेरचे त्रैमासिक विवरणपत्र ईआर-१ ऑनलाईन सादर करावे

सातारा : जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खासगी कार्यालय यांनी मार्च २०२६ अखेरचे ई आर-१ तिमाही विवरणपत्र कौशल्य विकास रोजगार उद्योजकता विभागाच्या संकेतस्थळावर दि.३० एप्रिल पर्यंत ऑनलाईन पद्धतीने सादर करावे,असे आवाहन कौशल्य विकास रोजगार उद्योजकता केंद्राचे सहायक आयुक्त सुनिल पवार यांनी केले. ऑनलाईन ई आर-१ सादर करण्याकरीता आपल्या आस्थापनेचा युजर आयडी व पासवर्ड या कार्यालयामार्फत यापूर्वीच कळविण्यात आलेला आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता केंद्र,सातारा दूरध्वनी क्र.०२१६२-२३९९३८ क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन श्री. पवार यांनी केले आहे.

# वन जमिनींच्या वाटपाबाबतची याद्या प्रसिद्ध, हरकतींसाठी १० दिवसांची मुदत

सातारा : सातारा वन विभागातील महसूल व इतर विभागाच्या ताब्यात असलेले अथवा वाटप केलेले वनक्षेत्राचा जिल्हास्तरीय विशेष तपास पथकामार्फत (डखढ) ताळमेळ घेऊन माहिती संकलित करण्याचे काम करण्यात आले आहे. वाटप करण्यात आलेल्या वनजमिनीबाबतची माहिती पडताळणी तालुकास्तरीय समिती व जिल्हास्तरीय विशेष तपास पथक (डखढ) यांचे स्तरावर करण्यात आली आहे. तथापी संबंधीत खातेदार नागरीक यांचे अवलोकनासाठी सदर याद्या जाहिररित्या तहसिलदार कार्यालय, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आल्या असून, या यादीमध्ये वाटपधारक यांचे माहितीत काही सुधारणा अथवा दुरुस्ती असल्यास १० दिवसाच्या आत आपले लेखी निवेदन संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे सादर, असे आवाहन उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी केले आहे.

# 'मसाप पिंपरी चिंचवड शाखेतर्फे महिला सन्मान पुरस्कार सोहळा संपन्न'

निगडी : विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा 'मसाप महिला सन्मान पुरस्कार सोहळा' महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने निगडी येथील संत तुकाराम संकुलातील शांता शेळके सभागृहात मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांना एकाच व्यासपीठावर सन्मानित करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा हा उपक्रम उपस्थितांच्या मनात अभिमान आणि प्रेरणा निर्माण करणारा ठरला. या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने करण्यात आले होते. ज्येष्ठ सिनेअभिनेत्री व निर्माती भाग्यश्री देसाई यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर डॉ. अलका भळगट तसेच उद्योजिका व सामाजिक कार्यकर्त्या मा. ललिता पाबळकर यांची उपस्थिती लाभली.



दीपप्रज्वलन करून सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याचा आणि महिला सन्मान पुरस्कार उपक्रमाच्या उद्दिष्टांचा परिचय देण्यात आला. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित करणे, त्यांच्या कार्याची प्रेरणा समाजापर्यंत पोहोचवणे आणि नव्या पिढीसमोर आदर्श निर्माण करणे हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू असल्याचे मसाप शाखा अध्यक्ष राजन लाखे यांनी प्रस्ताविकात स्पष्ट केले.

या सोहळ्यात साहित्य, सामाजिक, वैद्यकीय, विधी, शैक्षणिक, औद्योगिक आणि अध्यात्मिक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. साहित्य क्षेत्रात मा. ज्योती पुजारी आणि मा. अर्चना वर्टेकर यांना सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात भारती नलावडे आणि कल्पली जगताप यांना त्यांच्या समाजोपयोगी उपक्रमांसाठी सन्मानित करण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रात मा. योगिता लुंकड यांना त्यांच्या उल्लेखनीय सेवाभावी कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. विधी क्षेत्रात ड. शोभा कदम आणि ड. रुबी चटवाल यांना न्यायव्यवस्थेच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याबद्दल गौरविण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रात मा. राजश्री मराठे आणि मा. संगीता चव्हाण यांचा विशेष सन्मान करण्यात आला. औद्योगिक क्षेत्रात मा. वर्षा धारणे यांना उद्योजकतेच्या माध्यमातून समाजात स्वावलंबनाचा संदेश देण्यासाठी सन्मानित करण्यात आले. अध्यात्म क्षेत्रात मा. प्रिया जोग आणि मा. श्रुतीकीर्ती धस यांचा सन्मान करण्यात आला. अध्यात्माच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचार, नैतिक मूल्ये आणि मानसिक समाधान निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची उपस्थितांनी दखल घेतली.

याशिवाय विशेष 'मसाप सन्मान पुरस्कार' आशा तांबे यांना प्रदान करण्यात आला. त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक योगदानाबद्दल आणि विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्यासाठी हा विशेष सन्मान देण्यात आला. पुरस्कार वितरणानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महिलांच्या कार्याचा गौरव केला. मा. भाग्यश्री देसाई यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महिलांनी कोणत्याही क्षेत्रात प्रवेश केल्यास त्या त्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करतात. समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून अशा सन्मान सोहळ्यांमुळे त्यांना अधिक प्रेरणा मिळते.

डॉ. अलका भळगट यांनी महिलांच्या आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन समाजात नेतृत्वाची भूमिका स्वीकारावी, असे त्यांनी सांगितले. मा. ललिता पाळवकर यांनी महिलांच्या उद्योजकतेला चालना देण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावीपणे कार्यवाह संजय जगताप यांनी केले उपस्थितांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपाध्यक्ष डॉ. रजनी शेठ, किरण लाखे, जयश्री श्रीखंडे, कार्यवाह संजय जगताप तसेच कार्यकारिणी व सल्लागार मंडळाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

अतिथी व पुरस्कारार्थी यांचा निवडक व मार्मिक व ओघवत्या शैलीत परिचय उज्वला जगताप, कमल सोनजे, किरण लाखे, सुनिता बोडस, अंजु सोनवणे, इला पवार, विनीता श्रीखंडे, माधुरी मंगरुळकर , हेमांगी बोंडे, निलीमा पाठक, सुनंदा शिंगनाथ, जयश्री श्रीखंडे, अनघा पाठक, रेवती साळुंके यांनी करून दिला. सभागृहात उपस्थित मावळ वार्ता टीव्ही चॅनेल च्या विद्या आडसुळे तसेच डॉ माऊली फरांदे , अंजु सोनवणे, माधुरी डिसुझा अशा अनेक मान्यवरांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. सन्मानित महिलांच्या कार्याची माहिती ऐकताना उपस्थितांमध्ये प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांचे आभार मानून सोहळ्याची सांगता करण्यात आली. 'मसाप महिला सन्मान पुरस्कार सोहळा' हा केवळ पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम न राहता समाजातील महिलांच्या कर्तृत्वाचा उत्सव ठरला. विविध क्षेत्रांमध्ये महिलांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करून त्यांना प्रेरणेची नवी दिशा देणारा हा उपक्रम पिंपरी-चिंचवड परिसरातील सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात महत्त्वपूर्ण ठरला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# कालगावमध्ये बुधवारी संध्याकाळी चोरट्यांनी १४ शेतकऱ्यांच्या कृषिपंपाच्या केबल चोरल्या



**हेळगावातही केबल व दोर चोरी**

**कलगाव येथील घटनेच्या अगोदर काही दिवस हेळगाव येथील राजेंद्र सूर्यवंशी व हणमंत जाधव यांच्या मोटरच्या केबल चोरीस गेल्या होत्या. तर दोन दिवसांपूर्वीच नथुराम पवार यांच्या विहिरीतील पाण्यातील मोटरला बांधलेले मोठे दोर चोरीस गेले आहेत तर खराब झालेला दोर तोडून विहिरीत टाकला आहे.**

मसूर : कालगाव ता.कराड गावच्या उत्तरेला खडक नावाच्या शिवारात कृष्णा नदीपात्रात पाणी उपसा करण्यासाठी बसवण्यात आलेल्या चौदा शेतकऱ्यांच्या कृषिपंपाच्या हजारो रुपयांच्या केबल बुधवारी एकाच रात्रीच ९ ते १२ या वेळेमध्ये भार नियमनचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी संगणमतने चोरून नेल्याची घटना घडल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पाळले एकाच वेळी घडलेल्या या चोरीच्या घटनेने परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे

याबाबत अधिक माहिती अशी की कृष्णा नदीवर असणारा कवठे भुयाचीवाडी दरम्यानचा कोल्हापूर पद्धतीचा बंधारा वाहून गेलेला असल्यामुळे कालगाव येथील कृष्णा नदीचे पाणी पात्रामध्ये आत गेले आहे.

त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी आपले कृषीपंप सुमारे २०० ते २६० फुट केबल टाकून जोडले आहेत. चोरट्यांनी महावितरणच्या भारनियमनचा फायदा घेत बुधवारी संध्याकाळी बारा वाजता विज येणार होती त्यापूर्वीच या ठिकाणच्या केबलवर डल्ला मारून विशेष करून त्याच ठिकाणी सर्व केबल एकत्र करून केबल कोटिंग जाळून त्यातील तांब्याची तार चोरून नेली.

यामध्ये दत्तात्रय शंकर माळी ,संजय विलास चव्हाण, दत्तात्रय निवृत्ती माळी, राजेंद्र पंढरीनाथ तावरे ,अमरेश आनंदराव चव्हाण ,रामचंद्र राजाराम चव्हाण , युसुफ अहमद मुल्ला, अरविंद कुलकर्णी, अमोल अरविंद चव्हाण, संपतराव शिवाजी पाटील ,सुधाकर पुजारी, किरण शिंदे, लक्ष्मण पुजारी, अमोल रामचंद्र चव्हाण या सर्व शेतकऱ्यांच्या मिळून २८०० ते ३००० फूट कृषी पंपाच्या केबल चोरून नेल्या.

सध्या एप्रिल महिन्यात प्रचंड उन्हाळा असून शेतीला पाण्याची नितांत गरज आहे परंतु केबल चोरून नेल्यामुळे कृषीपंपच सुरू होणार नाहीत त्यामुळे पिके वाळण्याचा धोका निर्माण झाला आहे सदर घटनेची नोंद मसूर पोलिस स्टेशनला झाली असून केबल चोरून नेलेल्या अज्ञात चोरट्याचा शोध लावण्याचे पोलसांच्या पुढे आव्हान आहे. केबल चोरी केलेले चोर सापडले नाहीत तर कृषीपंप धारकांनी आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे. बुधवारी रात्री नऊ ते बारा या वेळेमध्ये केबल चोरून नेल्यामुळे शेतकऱ्यांच्यात घबराट पसरली आहे.

# कराड चिपळूण मार्गावरील धांडे पूल पुनर्बांधणीसाठी पाडला

(सुरेश संकपाळ)

पाटण : पाटण येथील बहुचर्चित २०० वर्षांपूर्वीचा ब्रिटिश कालीन धांडे पुल पुनर्बांधणीसाठी अखेर पाडला गेला. विजापूर - गुहागर राष्ट्रीय महामार्ग ई-१६६ साठी पाटण येथे रस्त्याचे काम सुरू आहे. पाटण शहरातील रस्त्यांचे व पुलाचे काम किमान दोन महिने चालेल असे सांगण्यात येत आहे. या कालावधीत या मार्गावरील वाहतूक मार्गात बदल करण्यात आला असल्याचे जिल्हा प्रशासनाने अधिसूचना व्दारे सांगितले आहे. कराड-चिपळूण या महत्त्वाच्या महामार्गावरील पाटण शहरातील केरा पुल ते रामापूर या दरम्यान सध्या रस्ता रुंदीकरणाचे काम वेगाने सुरू असून, याच पार्श्वभूमीवर या मार्गावरील धांडे पुलाची रुंदी व उंची वाढविणे अत्यावश्यक झाले होते. परिणामी, ब्रिटिशकालीन धांडे पुल आज बुधवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास जमीनदोस्त करण्यात आला.



पाटण शहरातील वाहतुक मार्गात खालीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे.

१. कराड व उंब्रज बाजुकडुन चिपळुण कडे जाणारी अवजड वाहतुक

* कराड व उंब्रज येथुन सरळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ०४ वरुन पाचवंड फाटा उंडाळे

* कोकरुड मलकापुर आंबा घाट संगमेश्वर वरुन चिपळुन कडे जाईल.

२. चिपळुन कड्न कराड व उंब्रज कडे येणारी अवजड वाहतुक :

* चिपळुन वरुन संगमेश्वर आंबा घाट मलकापुर कोकरूड उंडाळे पाचवड फाटा राष्ट्रीय महामार्ग क्र. ०४ वरुन कराड, उंब्रज कडे जाईल.

३. कराड व उंब्रज बाजुकडून चिपळूण कडे जाणारी सर्व हलकी वाहतुक

* कराड व उंब्रज येथुन नवारस्ता गव्हाणवाडी फाटा नेरळे गाँड येथुन कराड ते चिपळुन महार्गावरुन चिपळुन कडे जातील.

४. चिपळूण बाजुकडुन कराड उंब्रज कडे येणारी सर्व हलकी वाहतुक

* चिपळुन कडुन येणारी वाहतुक नेरळे गाँड गव्हाणवाडी फाटा नेवारस्ता मार्गे कराड व उंब्रज कडे जातील.

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतूक मार्गात केलेल्या बदलांबाबत सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे. असे अधिसुचनेत म्हणले आहे.

**रस्ता कामासाठी दोन महिन्यांच्या कालावधीत पाटण एसटी बस स्थानकातून तालुक्यातील गावांमध्ये जाणाऱ्या एसटी बस साठी कशा पध्दतीचे नियोजन आहे. याची संभ्रमत: प्रवाशांच्या मनामध्ये निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातून पाटण येथे येणारे व जाणारे प्रवासी आणि शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. या कालावधीत प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी एसटी आगाराने एसटीचे कशा पध्दतीचे नियोजन केले आहे. याची माहिती प्रवाशांना मिळावी अशी मागणी होत आहे.**

# आमदारांच्या पत्नीला दोन दिवसांत कुणबी दाखला मिळतो तर सर्वसामान्यांना का नाही : राजेंद्र निकम

(सुरेश संकपाळ)

पाटण: नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांसाठी मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी जातींचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर एवढी झटपट यंत्रणा राबविली जाते की जातींचे प्रमाणपत्र अवघ्या चार - दोन दिवसांत मिळाल्याची सातारा जिल्ह्यात शेकडो उदाहरणे आहेत. यापैकी कोरेगावचे आमदार महेश शिंदे यांच्या पत्नी व सध्याच्या सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा प्रियांका महेश शिंदे यांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र अवघ्या दोन दिवसांत मिळाल्याची माहिती समोर आली आहे. एवढी जलद तत्परता निवडणुकांसाठी व राजकीय मंडळींसाठी दाखवली जात असेल तर शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या मुलांना शिक्षणासाठी लागणाऱ्या प्रमाणपत्रासाठी महिनोन्महिने प्रतिक्षा का करावी लागते..? हि दुहेरी भूमिका प्रशासन का राबवते याचा उलगडा प्रशासन करेल का..? असा प्रश्न मराठा सेवक राजेंद्र निकम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे उपस्थित केला आहे.

या पार्श्वभूमीवर राजेंद्र निकम पुढे म्हणाले शैक्षणिक व इतर कामांसाठी मागास व इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र काढण्यासाठी तहसिल कार्यालयात सरासरी एक ते दिड महिन्यांचा कालावधी लागतो. हे प्रशासनाच्या नियमावलीतून पुढे आले आहे. तरीदेखील हा कालावधी उलटून पुढे अनेक जात प्रमाणपत्रासाठी सहा सहा महिने हेलपाटे मारायला लावणारे प्रशासन जिल्ह्यातील सर्व तालुक्यात पहात आहोत. त्यातल्या त्यात कुणबी प्रमाणपत्रासाठी एवढी किचकट कार्यप्रणाली प्रशासनाने करुन ठेवली आहे की प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अनेक समस्या व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. कुणबी प्रमाणपत्र इच्छुक धारकांना सहा सहा महिने हेलपाटे मारुन देखील प्रमाणपत्र न मिळाल्याची उदाहरणे आहेत अशा परिस्थितीत निवडणूक काळात राजकीय पुढारी वशिलेबाजांना केवळ दोन ते चार दिवसांत जात प्रमाणपत्र मिळतात हे आश्चर्य आहे.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी कोरेगावचे आमदार महेश शिंदे यांच्या पत्नी



व सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. प्रियांका महेश शिंदे या ओबीसी प्रवर्गातून जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा झाल्या. निवडणूकी पुर्वी त्यांनी कुणबी जात प्रमाणपत्रासाठी माहेरच्या प्रियांका बर्गे या नावाने दि.१८ मार्च रोजी अर्ज दाखल केला. अवघ्या दोन दिवसांत म्हणजे दि. २० मार्चला सकाळी ११ वा. त्यांना जात प्रमाणपत्र प्राप्त झाल्याची माहिती ऑनलाईन संकेतस्थळावर उपलब्ध आहे. हे एवढेच उदाहरण नाही तर निवडणूकीसाठी अनेक उमेदवारांना जात प्रमाणपत्र केवळ दोन ते चार दिवसांत उपलब्ध झाल्याची माहिती आहे. एवढी जलद तत्परता निवडणुकांसाठी व राजकीय मंडळींसाठी दाखवली जात असेल तर शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या मुलांना शिक्षणासाठी लागणाऱ्या प्रमाणपत्रासाठी महिनोन्महिने प्रतिक्षा का करावी लागते..? हि दुहेरी भूमिका प्रशासन का राबवते याचा मोठा प्रश्न सर्वसामान्यांसमोर आहे.

निवडणूक काळात उमेदवार, राजकीय पुढारी, वशिलेबाजांना ज्या धर्तीवर जात प्रमाणपत्र अवघ्या दोन-चार दिवसांत देण्यात येते त्याच पद्धतीने शेतकरी व सामान्य नागरिकांनाही जात प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावेत. सामान्य नागरिकांसाठी एक न्याय आणि सत्ताधाऱ्यांसाठी वेगळा न्याय हे प्रशासनाने राबवू नये आणि ते सर्वसामान्य नागरिकांना देखील मान्य होणार नाही.

आता पुढील शैक्षणिक वर्ष एक दोन महिन्यांत चालू होत आहे. या काळात विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रासाठी कुचंबणा करु नका अन्यथा दुहेरी भूमिका घेणाऱ्या प्रशासनास सर्व सामान्य जनतेच्या उद्रेकास सामोरे जावे लागेल असा इशारा शेवटी मराठा सेवक राजेंद्र निकम यांनी दिला आहे.

# अवैध दारू विक्रीवर कारवाई करा अन्यथा अंगावर दारू ओतून घेऊन आत्मदहन: ॲड.स्वप्नील पाटील

शिराळा(प्रतिनिधी): शिराळा तालुक्यातील भटवाडी गावच्या हद्दीत एम आय डी सी मध्ये होत असलेली अवैध दारू विक्री कारवाई करून बंद करावी अन्यथा तीच दारू अंगावर ओतून घेऊन आत्मदहन करू असा इशारा सामाजिक कार्यकर्ते ॲड. स्वप्नील पाटील यांनी पोलिसांना दिला.

काही दिवसांपूर्वी समाज माध्यमांवर शिराळा तालुक्यातील भटवाडी गावच्या हद्दीत एम आय डी सी कंपनीच्या समोर टपरीत महिलांच्या कडून दारू विक्री होत असलेचा व्हिडिओ व्हायरल झालेने खळबळ उडाली होती, त्यानंतर भटवाडी गावच्या काही ग्रामस्थांनी याबाबत शिराळा पोलिसांना तक्रार केली




होती पण त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई न झालेने ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते ड. स्वप्नील पाटील यांच्याशी संपर्क साधला, ड. स्वप्नील पाटील यांनी त्यांनतर जिल्हा पोलीस प्रमुख सांगली यांना तसेच शिराळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जंभाजी भोसले यांना निवेदन दिले,

एम आय डी सी मध्ये शासनाने जागा उद्योगांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत पण याठिकाणी अवैध धंदे सुरू आहेत, दारू विक्री, नशिल्या पदार्थांची विक्री सुरू आहे त्यामुळे भटवाडी व आसपासच्या गावातील तरुण व्यसनाधीन होत आहेत तसेच एमआयडीसी मधील कामगार वर्ग सुद्धा या सहज मिळणाऱ्या दारू मुळे व्यसनाधीन झाले आहेत त्यामुळे पोलिसांनी त्वरित यावर कारवाई करावी असे निवेदनात म्हटले आहे, जर पोलिसांनी कारवाई केली नाही तर तीच दारू अंगावर ओतून घेऊन शिराळा पोलीस ठाण्याच्या बाहेर आत्मदहन आंदोलन करू असा इशारा यावेळी ॲड. स्वप्नील पाटील यांनी दिला.

# सातारा जिल्ह्यात एस.टी.बस थांब्यावर महागड्या खाद्य वस्तूने ग्राहकांचे होते लूट

(अजित जगताप)

सातारा : सातारा जिल्ह्यात विविध प्रवासी दररोज प्रवासासाठी घराबाहेर पडतात. अशावेळी त्यांना जेवण व नाश्ता आणि पाण्यासाठी एस.टी. बस थांबा व हॉटेल धाब्यावर अवलंबून राहावी लागते. सध्या उन्हाळी सुट्टी सुरू झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रवास करत आहेत. एस.टी.बस ही सर्वसामान्य माणसांसाठी आजही दळणवळणाचे साधन आहे. परंतु सध्या सातारा जिल्ह्यातील अनेक एस.टी. बस थांबे आहेत . या स्टॉलवर प्रवाशांनापंधरा रुपयांचे थंड पिण्याचे पाण्याची बाटली तीस रुपयाला विकतात. दहा रुपये किमतीचा वडा तीस रुपयाला विकला जातो. या एस टी बस थांबा असणाऱ्या हॉटेल व धाब्यांवर अक्षरशा



आर्थिक लूट केली जाते. वर्षानुवर्षे अन्न व औषध प्रशासनाच्या विभागामार्फत त्याची कायदेशीरच्या तपासणी होत नाही. मूळ कंत्राटदार आणि त्याची देखभाल करणारे तिसरा कंत्राटदार असे तीन वाटेकरी हॉटेल व धाब्याच्या माध्यमातून राजेरोसपणाने दरोडा टाकत आहेत. त्यामुळे सामान्य माणसांना इच्छा असूनही अशा एसटी बस थांब्यावरील महागडे खाद्यपदार्थ विकत घेणे परवडत नाही.

सामान्य प्रवासी एस. टी. मधून अर्धे तिकीट असणारे महिलावर्ग व वयोवृद्ध आणि अपंग प्रवासी प्रवास करत असतात. त्यांना महागडे खाद्यपदार्थ घेणे परवडत नाही. फक्त सातारा जिल्ह्यात अशा धाबे व हॉटेलमधून लूट सुरू आहे. याबाबत राजकीय पक्षाचेही हितसंबंध गुंतल्यामुळे ते सुद्धा हा मूलभूत प्रश्न उपस्थित करत नाहीत. सध्या कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते सामान्य माणसांच्या प्रश्नावर आवाज उठवतील. अशी अशी सामान्य एस.टी. प्रवाशांना वाटू लागलेली आहे. याबाबत प्रवासी संघटनेने एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना जाब विचारावा अशी मागणी पुढे आलेले आहे.

# देहदानातून समाजाला दिला अंतिम संदेश

## प्रभावती खटावकर यांचे निधन; कराड येथे देहदान

कराड : शहरातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक व दत्त चौक परिसरातील रहिवासी कै. प्रभावती मधुकर खटावकर (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात कुटुंबीयांनी त्यांच्या इच्छेनुसार कृष्णा मेडिकल अँड रिसर्च सेंटर, कराड येथे देहदान करून समाजापुढे आदर्श ठेवला.



कै. प्रभावती खटावकर

या सामाजिक कार्यकर्ते श्री. दिपक खटावकर यांच्या मातोश्री होत. शिक्षण व सामाजिक कार्याची विशेष आवड, तसेच प्रत्येक गोष्टीकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्याची वृत्ती ही त्यांची ठळक वैशिष्ट्ये होती. त्यांनी जुलै २०१६ मध्येच देहदानासाठी नोंदणी करून आपल्या विचारांची प्रगल्भता दाखवून दिली होती.

मनमिळाऊ, शांत, संयमी, लोकसंग्रही आणि प्रेमळ स्वभावामुळे त्या 'खटावकर काकू' म्हणून सर्वत्र परिचित होत्या. त्यांच्या निधनाने खटावकर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या देहदानाच्या निर्णयामुळे समाजात जनजागृती होण्यास मोठी मदत होणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# जयाद्री मल्हारसागर धरणात ३६ टक्के पाणीसाठा; ४३ गावाना पिण्यासाठी पुरेसा



पुरंदर(प्रतिनिधि): जलव्यवस्थापना करिता सदैव उदासीन ठरलेल्या दुष्काळी पुरंदर तालुक्यातील कऱ्हा नदीच्या मल्हारसागर धरणात यंदा निसर्गता सदैवाने यंदा ३६टक्के आणि ४३गावांना पुरेसा पाणी साठा उपलब्ध आहे.सदैव दुष्काळी असणाऱ्या पुरंदर तालुक्याला वरदान ठरलेल्याकऱ्हा नदीवरील मल्हारसागर धरणात ३६ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून या धरणावर पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून असणाऱ्या ४३ गावांना पिण्याच्या पुरेसा पाणीसाठा उपलब्ध आहे.निसर्गता मिळालेले पाणी आता उपयुत ठरत आहे परंतु उन्हाळ्याच्या मागिल काळात पाणी टँचाई तीव्र जाणवत होती. कायमस्वरूपी हा प्रश्न सोडविण्यासाठी वीर चे पाणी मल्हारसागरात आले पाहिजे अशी मागणी सर्वत्र होतं आहे. पुरंदर तालुक्यातील मल्हारसागर धरणाची पाणीसाठा क्षमता ही पाऊण टीएमसी असून गतवर्षी चांगला पाऊस झाल्याने धरण पूर्ण क्षमतेने भरून चांगला पाणीसाठा निर्माण झाला होता. या धरणावर जेजुरी,जेजुरी औद्योगिक वसाहत,बारामती तालुक्यातील मोरगाव व सोळा गावे,माळशिरस पारगाव योजना,पांडेश्वर मावडी योजना यातून ४३ गावांना पिण्याचे पाणी दिले जाते.तर सुमारे एक हजार हेक्टर शेती हंगामी स्वरूपात ओलीता खाली येते.

मल्हारसागर धरणाची पाणी साठवणूक क्षमता ७८८ दशलक्ष घनफूट असून मृतसाठा २०० दशलक्ष घनफूट आहे. मागील वर्षी समाधान कारक पाऊस झाल्याने आज पर्यंत धरणात ४२५ दशलक्ष घनफूट पाणी साठा शिल्लक आहे.मृतसाठा वगळता सुमारे ३६ टक्के पिण्यासाठी पाणी साठा उपलब्ध आहे. हे पाणी ऑगस्ट अखेर पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहे अशी माहिती नाझरे पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता गणेश गायकवाड यांनी दिली.

पुरंदर तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान ४९६ मिलिमीटर असून गतवर्षी सरासरी पेक्षा दुप्पट पाऊसाची नोंद झाली होती. जेजुरी एम आय डी सी,जेजुरी शहर,मोरगाव व १६ गावे,नाझरे व पाच गावे तसेच कोळविहिरे योजनेला पिण्याचे पाणी तसेच सुमारे शेत जमिनीला हंगामी स्वरूपात पाणी दिले जाते. नाझरे धरणात पुरेसा पाणी साठा उपलब्ध असल्याने उन्हाळी पिकांसाठी आवर्तन देण्यात येत आहे. कालवा व उपसा सिंचन द्वारे २०० हेक्टर शेती त्यामुळे ओलिता खाली येत आहे. यावर्षी मल्हारसागर धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्याने सुमारे ४३ गावांची तहान भागणार आहे.पाण्यासाठी होणारी वणवण यावर्षी करावी लागणार नाही.

# उंब्रजमध्ये गटारगंगा रस्त्यावर

## उंब्रजकरांचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात

उंब्रज(प्रतिनिधी): उंब्रज,ता.कराड येथे पोलीस स्टेशन परिसरात गटार तुंबल्याने दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावरती आले असून सदर पाण्यातून वाट काढताना चारचाकी,दुचाकी वाहनधारक तसेच नागरिकांना मोठ्या कसरतीचा सामना करावा लागत आहे.




सदरचे दुर्गंधीयुक्त पाणी पोलीस स्टेशन समोरील बोगद्यातून पलीकडील बाजूच्या गटारास मिळत आहे. सदर बोगद्यामध्ये दुर्गंधीयुक्त पाण्याची गटारगंगा वाहत असल्यामुळे उंब्रजकरांचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. या समस्येबाबत नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटत असून तुंबलेले गटार खुले करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी मध्यरात्रीच्या सुमारास सदर पाण्याचा अंदाज न आल्यामुळे या ठिकाणी दुचाकी घसरून झालेल्या अपघातामध्ये दुचाकी वरील दांपत्य किरकोळ जखमी झाल्याची माहिती नागरिकांनी दिली. त्यामुळे भविष्यात या ठिकाणी गंभीर दुर्घटना घडण्याअगोदर तसेच एखादा गंभीर साथीचा आजार पसरण्याअगोदर स्थानिक प्रशासनाने सदरचे गटार खुले करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.